नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०२/२०२६ (गुरूवार )

# कापूस चोरीचा गुन्हा उघड, तिन आरोपी अटक
# वाहनासह ३ लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त
# भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर :-** पोलीस स्टेशन भिवापूर येथे फिर्यादी नामे बाळकृष्ण राजाराम ठाकरे , रा भागेबोरी, ता भिवापुर, जि नागपुर यांनी तक्रार दिली की, फिर्यादी ने दिनांक ०७/०२/२०२६ रोजी सांयकाळी ०६/०० वा दरम्यान मौजा भागेबोरी येथील आपल्या शेतातुन कापसाचा तोडा करून तो कापुस नायलान चे आठ पोत्यामध्ये भरून छोटा हत्ती वाहन बोलावुन त्यात भरून घरी घेवुन जात असतांना शेताला लागुन असलेल्या कॅनलचे खडडयात छोटा हत्ती वाहन फसला बरेच प्रयत्न करूनही वाहन निघाले नाही तसेच खुप रात्र झाल्याने तोडा केलला ३२० किलोग्रॅम कापुस हा छोटा हत्ती वाहनात भरून कॅनलचे खडडयात सोडुन फिर्यादी हे घरी परत आले. दुसऱ्या दिवशी दिनांक ०८/०२/२०२६ रोजी सकाळी ०७/०० वा फिर्यादीने सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता कापुस भरलेले ८ पोते एकुण ३२० किलो ग्रॅम कापुस कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला असल्याचे फिर्यादीला दिसले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

भिवापुर पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू केला. दिनांक २६/०२/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदाराच्या माहीतीच्या मदतीने **आरोपी नामे १) अल्केश पुंडलिक महाजन, वय २४ वर्ष, रा. आझाद चौक भिवापूर, ता. भिवापूर जि. नागपूर २) नेताजी उर्फ नितेश दामोदर शेळके, वय २७ वर्ष, रा. भागेबोरी ता. भिवापूर ३) अश्विन हरिभाऊ सेलोटे, वय २९ वर्ष, रा. झिलबोडी, ता. भिवापूर यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले.** नमुद आरोपींना भिवापुर येथुन ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयासंबधाने कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी संगनमत करून मौजा भागेबोरी येथुन ३२० किलो कापूस चोरी करून नेल्याचे सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल ३२० किलो कापूस किंमती १८,१२०/-रूपये व गुन्ह्यात वापरण्यात आलेले ट्रॅक्टर क्र. एम**

**एच—३६/झेड— ३२७४ किंमती ३,००,०००/—रूपये असा एकूण ३,१८,१२०/— रुपयाच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद तिन्ही आरोपीतांना भिवापूर पोलीसांनी अटक केली आहे.**




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, वाहनांसह ३० लाख ४० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २५/०२/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी तारणा फाटा येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्र. एम. एच ३६ ए.बी. ३७४९ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा **चालक नामे गणेश ताराचंद्र सेलोकर, वय ३५ वर्ष, रा. वलनी, ता. पवनी, जि. भंडारा हा मिळुन आला.** तसेच पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहिती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्र. एम. एच ३६ ए.बी. ३७४९ किंमती**

**३०,००,०००/—रूपये २) ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण ३०,४०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३ (२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ७ मोबाईल सह ७७ हजार ४८० रूपयांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २५/०२/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा निहारवानी येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौदा पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) संदीप अरूण खांडेकर, रा. निहारवाणी मौदा २) प्रणय नाशीक बागडे, उमरी भंडार ३) अजय भिमराव हटवार, रा. परसोडी, मौदा ४) प्रज्वल खुशाल खांडेकर, रा. निहारवाणी मौदा ५) आदेश ज्ञानेश्वर वासनिक, रा. फुलमोगरा भंडारा ६) प्रित संजीव वालकर, रा. फुलमोगरा, भंडारा ७) अतुल उत्तम रामटेके, रा. फुलमोगरा, भंडारा** यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून **५२ तास पत्ते आणि** रोख रक्कम ७,४८०/—रूपये ०७ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किंमती ७०,०००/— रूपये असा एकुण ७७,४८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन मौदा येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद

दिनांक २५/०२/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण २१,८४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी क्र. १) किशोर नामदेवराव घरत, वय ४३ वर्ष, रा. हिवरा हीवरी, ता. उमरेड जि. नागपूर २) संतोष दशरथ आमदे, वय ५३ वर्ष, रा. बेला, ता. उमरेड, जि. नागपूर यांचे वर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे विलास बलदेव चौधरी, वय ५१ वर्ष, रा. कोथुळणा याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी क्र. १) नामे प्रशांत खुशाल ढोबळे, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. २, केळवद ता. सावनेर २) महिला आरोपी ३) गोविंदा नारायण यादव, वय २२ वर्ष, रा. लोहगड, त. कळमेश्वर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे नंदु शंकर शेंडे, वय २९ वर्ष, रा. विरखंडी धापर्ला, ता. भिवापुर याचेवर गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे सुनिल बुधाजी मांढरे, वय ३८ वर्ष, रा. डोगंरमौदा, ता. कुही, जि. नागपुर याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी याचे वर एक गुन्हा, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी क्र. १) महिला आरोपी २) रामनाथ संपत भलावी, वय ६५ वर्ष, रा. गुगलडोह रामटेक, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) नामे नरेंद्र शेषराव बनसिंगे, वय ४४ वर्षे, रा. अंबाडा देशमुख, ता. नरखेड २) महिला आरोपी याचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे जिवन चंद्रशेखन चरडे, वय ३९ वर्ष, रा. विकास नगर, कोंढाळी ता. काटोल याचे वर एक गुन्हा, **पोलीस स्टेशन काटोल** आरोपी नामे दिपक हरिदास तागडे, रा. येनवा काटोल, जि. नागपुर यांचे वर एक गुन्हा नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १५ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ११६ लिटर मोहाफुल गावठी दारू २) २१२४० मिली देशी दारू असा एकुण २१८४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने